प्रशासकीय कारणास्तव बदली करण्याबाबत
डॉ.प्रविण वसंतराव भालेराव, पशुधन विकास अधिकारी(गट-अ)

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन आदेश क्रमांक पसंप्र-२०१७/प्र.क्र.२३२/पदुम-१
५ वा मजला विस्तार, मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- ९ नोव्हेंबर, २०१७

वाचा :-१) शासन आदेश क्र. एसएलके २०१७/प्र.क्र.११३/पदुम-४, दि.१२.९.२०१७
२) सह आयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) पुणे यांचे पत्र क्र. पविअ/प्र.क्र.८५/डॉ.भालेराव/ १६३१/२०१७ पसं-२, दि.२८.९.२०१७

प्रस्तावना:-

डॉ.प्रविण वसंतराव भालेराव, पशुधन विकास अधिकारी (गट - अ) हे दुग्ध व्यवसाय क्षेत्रातील तज्ञ असल्यामुळे, त्यांना दुग्ध व्यवसाय क्षेत्रातील विशेष ज्ञान असल्याने ते राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डाच्या सहकार्याने विदर्भ व मराठवाडयात सुरु करण्यात आलेल्या दुग्ध विकास प्रकल्पाच्या समन्वयासाठी व प्रकल्प संचालकाच्या मदतीसाठी डॉ.भालेराव यांची विशेष कार्य अधिकारी म्हणून विदर्भ व मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प, मा.मुख्यमंत्री कार्यालय, हैद्राबाद हाऊस, नागपूर येथील कार्यालयात शासन आदेश क्र. एमएलके-२०१७/प्र.क्र.११३/ पदुम-४, दि. १२.९.२०१७ अन्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे. तथापि सद्य:स्थितीत डॉ. प्रविण वसंतराव भालेराव हे सहाय्यक प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,वर्धा या पदावर प्रतिनियुक्तीवर असल्याने त्यांचे वेतन सदर पदावरुन आहरीत करण्यात येत असल्याने त्यांच्या वेतनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे डॉ.भालेराव यांच्या सेवा मूळ विभागाकडे परत घेऊन त्यांना पदस्थापना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश:-

वरील वस्तुस्थिती विचारात घेता, प्रस्तुत प्रयोजनार्थ डॉ. प्रविण वसंतराव भालेराव यांची जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वर्धा या पदावरील प्रतिनियुक्ती संपुष्टात आणून त्यांच्या सेवा पशुसंवर्धन विभागाकडे परत घेण्यात येत आहेत. तसेच महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम ४(४) व ४(५) मधील तरतूदी नुसार सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने डॉ. प्रविण वसंतराव भालेराव, पशुधन विकास अधिकारी(गट-अ) यांची पदस्थापना खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र.३ मध्ये नमूद ठिकाणी करण्यात येत आहे.

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नांव	पदस्थापनेचे ठिकाण	शेरा
१	२	३	४
१	डॉ.प्रविण वसंतराव भालेराव, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वर्धा	पशुधन विकास अधिकारी (गट-अ), पंचायत समिती(विस्तार), भिवापूर, ता,भिवापूर, जि. नागपूर	रिक्त पदावर

२. डॉ.प्रविण वसंतराव भालेराव यांनी वरीलप्रमाणे पदस्थापनेच्या पदावर विनाविलंब रुजू व्हावे. तसेच संबंधित नियंत्रण अधिकारी यांनी डॉ.भालेराव यांचा रुजू अहवाल शासनास सादर करावा.

३. डॉ.भालेराव हे वरीलप्रमाणे बदलीच्या पदावर रुजू झाल्यानंतर त्यांनी उक्त दि.१२.९.२०१७ च्या आदेशानुसार विशेष कार्य अधिकारी, विदर्भ व मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प, मा.मुख्यमंत्री कार्यालय, हैद्राबाद हाऊस, नागपूर या पदाचे कामकाज हाताळावे (उसनवारी तत्वावर). तसेच त्यांचे वेतन व भत्ते पशुधन विकास अधिकारी (गट-अ), पंचायत समिती(विस्तार), भिवापूर, ता,भिवापूर, जि. नागपूर या पदावरुन आहरीत करण्यात यावे.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१७११०९१७०३१६८८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vinod Sopanrao Mendhe

Digitally signed by Vinod Sopanrao Mendhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3dfd984bb7c5aede090473e34b1c93fa9f36d97d56c0cf07812a43c5ca5d6a24, cn=Vinod Sopanrao Mendhe
Date: 2017.11.09 16:51:19 +05'30'

(वि.सो.मेंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

१. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-०७.
२. आयुक्त दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
४. सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) पुणे
५. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नागपूर
६. महाव्यवस्थापक, राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ, पश्चिम द्रुतगती महामार्ग, गोरेगाव (पू), मुंबई.
७. प्रकल्प संचालक, विदर्भ व मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प द्वारा, मदर डेअरी, सिव्हील लाईन्स, नागपूर
८. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वर्धा
९. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, नागपूर/वर्धा
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/वर्धा
११. डॉ.प्रविण वसंतराव भालेराव, पशुधन विकास अधिकारी (गट-अ) द्वारा आयुक्त पशुसंवर्धन, म.रा.पुणे.
१२. निवड नस्ती.